## सामर्थ्याचे बळ

**(पान १ वरून)** होते. परिणामी त्या सामर्थ्याचा उपयोग कोठे आणि कसा करावा याचा साकल्याने विचार करण्याची ताकद अशी व्यक्ती राखून असते. विवेक असलेली अशी व्यक्ती छोटे छोटे बदल करून पाहायला प्रवृत्त होते.

जशी अहिल्यानगरमधील महिलेने तिच्या एकटीच्या बळावर जातपंचायत भरू दिली नाही. सर्वांनाच तिच्यासारखी समाजसेवा करणे शक्य होईलच असे नाही. पण सामान्य महिला त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात बदल घडवू शकतील. वैचारिक बैठक पक्की झाली की वितंडवाद घालण्याची आणि अभिनिवेशाची आवश्यकता नसते हेही कदाचित महिलांच्या लक्षात येऊ शकेल. इतके सगळे बदल सामर्थ्य आणि निर्धार घडवू शकेल. पण सामर्थ्याचे बळ कमावण्यासाठी महिलांनाच सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची गरज आहे.

## लखनौचा हैदराबादवर ५ गडी राखून विजय

**हैदराबाद । वृत्तसंस्था**

आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरलेल्या ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ सुपर जायंट्सच्या संघाने आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील पहिल्या विजयाची नोंद केली आहे. शार्दुल ठाकूरच्या भेदक माऱ्याच्या जोरावर धडाकेबाज फलंदाजीची हवा काढत आधी लखनौच्या संघाने सनरायझर्स हैदराबादच्या संघाला १९० धावांवर रोखले. त्यानंतर १९१ धावांचा पाठलाग करत १६.१ षटकांत पाच गडी राखून सामना खिशात घातला.

सनरायझर्स हैदराबादच्या संघाने दिलेल्या १९१ धावांचा पाठलाग करताना लखनौ सुपर जायंट्स संघाची सुरुवात खराब झाली. पण त्यानंतर मिचेल मार्शचे अर्धशतक ५२ (३१) आणि निकोल पूरन याच्या २६ चेंडूतील ७० धावांच्या वादळी खेळीसह लखनौने सामना जिंकला.लखनौ सुपर जायंट्सकडून मिचेल मार्श ५२, निकोलस पुरण ७० ऋषभ पंत १५ अब्दुल समादने २६ धावा केल्या. सनरायझर्स हैदराबादकडून पॅट कमिन्सने २ ,हर्षल पटेल, महंमद शमी, अ‍ॅडम झम्पाने १-१ गडी बाद केला.

तत्पूर्वी लखनौ सुपर जायंट्स संघाचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.सनरायझर्स हैदराबाद संघाच्या डावाची सुरुवात करण्यासाठी ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्माने ही सलामी जोडी मैदानावर उतरली. दोन्ही फलंदाजांनी पहिल्या विकेटसाठी १५ धावांची सलामी दिली. मात्र शार्दूल ठाकूरने अभिषेक शर्माला ६ धावांवर निकोलस पुरणकडे झेलबाद केले. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या ईशान किशनला शून्यावर बाद करत सनरायझर्स हैदराबाद संघाला दुहेरी धक्का दिला. त्यानंतर ट्रॅव्हिस हेडने नितीश कुमार रेड्डी सोबत भागीदारी रचून संघाला सावरले. मात्र प्रिन्स यादवने ट्रॅव्हिस हेडला ४७ धावांवर त्रिफळाचित केले. ट्रॅव्हिस हेड ४७, अनिकेत वर्मा ३६, नितीश कुमार रेड्डी ३२ पॅट कमिन्स १८ यांनी केलेल्या शानदार फलंदाजीच्या बळावर सनरायझर्स हैदराबाद संघाला २० षटकांत १९० धावा काढता आल्या. लखनौ सुपर जायंट्स कडून शार्दूल ठाकूरने ४ तसेच रवी बिश्नोई, आवेश खान, दिगवेश राठीने १-१ गडी बाद केले. शार्दूल ठाकूरने आयपीएल क्रिकेट स्पर्धेमध्ये आपले १०० बळी पूर्ण केले.

## पतंजली रिसर्च फाउंडेशनचे शेतकऱ्यांना प्रोत्साहन



**हरिद्वार ।** प्रादेशिक ग्रामीण, राज्य सहकारी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी सर्वोच्च पर्यवेक्षक संस्था म्हणून भारतातील नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट (नाबार्ड) च्या वतीने पतंजली रिसर्च फाउंडेशनच्या सभागृहात शेतकऱ्यांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ग्रामीण भागातील विविध विकासात्मक उपक्रमांमध्ये गुंतवणूक आणि शेतीला प्रोत्साहन या कार्यक्रमात देण्यात आले.

सुरुवातीला आचार्य बाळकृष्ण यांनी पाहुण्यांचे शाल व पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी नाबार्डचे प्रतिनिधी तज्ज्ञ उपस्थित होते. नाबार्ड ही ग्रामीण उद्योगांच्या विकासासाठी देशातील सर्वात महत्त्वाची संस्था आहे. यामध्ये पशुसंवर्धनासाठी अनेक योजना आहेत, ज्यात किसान क्रेडिट कार्ड योजना, व्याज अनुदान योजना, दीर्घकालीन कर्ज आणि पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी इत्यादींचा समावेश आहे. या योजनांचा उद्देश भांडवली गुंतवणूक, स्थिर उत्पन्न आणि रोजगाराच्या संधी वाढवणे हा आहे. नाबार्ड भारतातील प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँका चालवते, तसेच कृषी प्रक्रिया सुधारते. या व्यतिरिक्त, नाबार्डने ग्रामीण भागात नवनवीन शोध, सामाजिक बदल आणि सामाजिक उपक्रमांच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे बाळकृष्ण यांनी भाषणात सांगितले. पतंजलीच्या भविष्यातील योजनांवर प्रकाश टाकताना ते म्हणाले की, पतंजलीच्या कृषी क्षेत्रातील योजनांमध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे आणि नैसर्गिक शेती पद्धतींचा अवलंब करणे आदी गोष्टींचा समावेश आहे.

## त्र्यंबक देवस्थानाला ‘अ’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा

**(पान १ वरून)** निवृत्तिनाथ महाराज यात्रा, श्रावण महिना प्रदक्षिणा यासारख्या अनेक धार्मिक कार्यक्रमांमुळे भाविक मोठ्या प्रमाणात त्र्यंबकेश्वरला येत असतात. या पार्श्वभूमीवर त्रंबक नगरपरिषद क्षेत्रात पायाभूत सुविधा आणि इतर विकास कामांसाठी त्रंबक नगरपरिषदेला मअफवर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याचा ठराव नगर परिषदेने २८ ऑगस्ट २०२४ रोजी मंजूर केला होता.

या ठरावानुसार नाशिक विभागीय आयुक्तांनी राज्य सरकारला प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावावर नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने निर्णय घेत राज्य सरकारला श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरला ‘अ’ तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची शिफारस केली होती. या शिफारशीला सरकारने आज मान्यता दिली.

## आजपासून ‘देशदूत पंचवटी ॲनेक्स प्रॉपर्टी एक्स्पो’

**(पान १ वरून)** ॲड. वैभव शेटे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. भविष्यातील ‘स्मार्ट सिटी’ बनण्यासाठी नाशिकची वाटचाल सुरू असतांना नाशिक शहरातील प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पंचवटीने विभागाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. भौगोलिक विस्तार पाहता शहराच्या डेड एन्डपर्यंत नागरी वसाहतींचे जाळे पसरल्याचे दिसून येते. सरकारी-निमसरकारी आस्थापना, शाळा, महाविद्यालय, आसपासच्या गावांना जोडणारे राज्य व राष्ट्रीय महामार्ग, कृषी उत्पन्न बाजार समिती, मोठ्या बाजारपेठा, शेतीप्रधान परिसर यामुळे रहिवासी क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे पंचवटीच्या नवीन आडगाव नाका, जत्रा चौफुली, रासबिहारी रोड, कोणार्कनगर, बळी मंदिर, छत्रपती संभाजीनगर नाका आदी भागातील अर्थचक्राला गती प्राप्त होत आहे.

प्रदर्शनाचे पर्यावरणीय पार्टनर पपायाज नर्सरी हे आहेत. प्रॉपर्टी एक्स्पोत नाशिकमधील नामांकित बांधकाम व्यावसायिकांचे ३० स्टॉल्स उपलब्ध करण्यात आले आहेत. त्यात अनेक लाभदायक योजनांचा समावेश आहे. सामान्यजनांना गृहस्वप्नाची पूर्ती करण्याची अनोखी संधी प्रॉपर्टी एक्स्पोच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आली आहे. ३० मार्च २०२५ पर्यंत दररोज दुपारी १ ते रात्री ९ वाजेपर्यंत सर्वांना प्रवेश खुला आहे. नागरिकांनी ङ्गदेशदूतफ आयोजित पंचवटी प्रॉपर्टी एक्स्पोला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### नामांकित बांधकाम व्यावसायिकांचा समावेश

प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये पार्कसाईड, ललित रुंगटा ग्रुप बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, ए. सी. जैन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, कीस्टोन कन्स्ट्रक्शन, फोर्थ डायमेंशन प्रॉपर्टीज, दक्ष रिअल्टी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, ग्रोवर्थ रिअल सोल्यूशन्स प्रा. लि., पुष्प्रीत रिअल्टी, सोमविजय कन्स्ट्रक्शन, ओंकारेश्वर इन्फ्राटेक, कनकलक्ष्मी डेव्हलपर्स, विहान ग्रुप बिल्डर-लँड डेव्हलपर, शेठ रिअल्टी, क्रिश ग्रुप लँड डेव्हलपर्स अँड बिल्डर्स, समर्थ ग्रुप, सचिन पी. बागड इंजिनिअर्स-बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, नेरकर प्रॉपर्टीज, आशापुरी कन्स्ट्रक्शन्स, स्कायवर्ड बिल्डकॉन, श्याम ग्रुप, स्कायवार्ड बिल्डकॉन हे नामांकित बांधकाम व्यावसायिक सहभागी झाले आहेत.


## ललित रुंगटा ग्रुपच्या ऑफरला ग्राहकांचा उदंड प्रतिसाद

**नाशिक ।** ललित रुंगटा ग्रुपने ‘एलिगांते’ आणि ‘फ्लोरेंझा’ या दोन प्रकल्पांवर सुरू केलेली १५ ग्रॅम सोन्याच्या नाण्याची खास ऑफर ३० मार्च रोजी, गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर समाप्त होत आहे. या आकर्षक ऑफरला ग्राहकांचा उदंड प्रतिसाद मिळाला असून, अनेक जणांनी आपल्या स्वप्नातील घर किंवा दुकान खरेदी करून दुप्पट आनंद साजरा केल्याचे संचालकांनी जाहीर केले आहे.

गुढीपाडवा मुहूर्तावर घर किंवा दुकान खरेदी करणे अत्यंत लाभदायक मानले जाते. त्यामुळे, ज्या ग्राहकांनी यापूर्वी घर किंवा दुकान खरेदी करण्याचा विचार केला आहे, पण अजूनही निर्णय घेतलेला नाही किंवा ज्यांना या ऑफरची माहिती नव्हती, त्यांच्यासाठी ही एक सुवर्णसंधी आहे. ग्राहकांना सोन्याचे नाणे देऊन त्यांच्या स्वप्नांना अधिक सोनेरी बनवण्याचा प्रयत्न आहे. तसेच ऑफर ३० मार्चला समाप्त होत असल्याने, इच्छुक ग्राहकांनी त्वरित संपर्क साधावा, असे ललित रुंगटा ग्रुपतर्फे सांगण्यात आले.

रुंगटा एलिगांते प्रकल्प पंचवटी ॲनेक्स, बळी मंदिरासमोर, येथे स्थित हा प्रकल्प महामार्गाशी उत्तम जोडणी असलेला आहे. रुंगटा फ्लोरेंझा हा गोविंद नगरजवळील प्रकल्प आहे. दोन्ही प्रकल्पांमध्ये आलिशान, समृद्ध आणि जीवनशैली सुविधा आहेत, जी प्रत्येक कुटुंबासाठी योग्य आहेत. ज्येष्ठ नागरिक आणि मुलांपासून ते आधुनिक जीवनशैली जगणाऱ्या कुटुंबांपर्यंत, प्रत्येकासाठी या प्रकल्पांमध्ये काहीतरी खास आहे.





**आडवे शब्द :** १) काळजी ४) तिरस्कार ७) मधमाशी ९) भांडण १०) दमणूक ११) वर्तमान पत्रातील कप्पा १३) इजा, खून १५) पौर्णिमा १६) चारही बाजूस पाणी असलेली जमीन १७) चैत्यहीन १९) मुस्लिमानांचा उपवासाचा महिना २१) राजाची मुलगी २२) जलवाहतुकीसाठी वापरले जाणारे वाहन २३) ठार मारणारा २४) वेळ (ग्रा) २६) उदर २८) देह २९) वल्कल लावणारा मुनी ३१) अत्यंत प्रिय ३२) नाटकातील शेवटाचे पद ३४) नवरदेव ३५) माणूस ३७) नटबोल्ट पिळण्याचे एक साधन ३८) ताऱ्यांचा समूह ४०) थकणे ४१) हिस्सा, भाग ४३) आकाशयान ४५) जेवताना पोळीबरोबर खाण्याचा पातळ पदार्थ ४६) ताठा, गर्व ४८) पांढूरका रंग ४९) पाठवणी ५१) स्त्री, महिला, बाई ५३) दक्ष ५४) चेष्टेत म्हातारा ५५) गुलबंदातील फूल ५७) नृत्य करतेवेळी दैवत ६०) फळातील द्रव ६१) एक दागिना ६२) वेळा (ग्रा) ६४) लाजणारा, बुजणारा ६६) तोफांचा विळखा ६७) सरोवर ६८) तीव्र ऊन ६९) विहिर ७०) इच्छा

**उभे शब्द :** १) लग्न सोहळा २) नमस्कार ३) स्वामी, मालक ४) पती-पत्नी ५) व्यापारात बसलेले मोठे नुकसान ६) निष्णात ७) बंदी, हरकत ८) लालूच दाखविणे (वा.प्र) ८ अ) धन, रान १२) खर्चात कपात १४) पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना १८) संरक्षक भिंत २०) रोगाची साथ, मरण दशा २१) रात्र २५) कोळशाची पूड २७) ठेवेदार २८) संभवनीयता २९) श्रीफळ ३०) विश्रांती घेत घेत ३३) धपाटा, रद्द ३४) समुद्रातील अग्नी ३६) नमस्कार,... नटका ३९) दशानन ४१) मावळ चेष्टा ४२) घसट, घनिष्ठ संबंध ४४) शिकार ४५) वेडावाकडा, दुर्बोध, कर्नाटकी ४७) धुणे (पाप वगैरे) ४८) मिठी, विळखा ५०) उत्तराधिकारी ५२) अपशकुन करणे ५३) शोभिवंत, शोभणारा ५५) उदर निर्वाह ५६) बगळा ५८) गवंडी ५९) उपासना, प्रार्थना, पूजा ६१) समुद्र ६३) कडक आणि चिवट ६५) खुजा, उंचीला कमी

### शब्दकोड२३३चे उत्तर



देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले. ● संपादक - * **डॉ. वैशाली बालाजीवाले** ✆ : शहर- २५७५७१६, २५७२४००, फॅक्स - २५७०९३८. ● नाशिकरोड कार्यालय - २९४२२०३, ● मालेगाव कार्यालय फोन व फॅक्स - ०२५५४-२९९२०३, ● सिन्नर फोन व फॅक्स -०२५५१ - २९९२०३, ● दिंडोरी फोन व फॅक्स - ०२५५७-२२२८८८, ● निफाड फोन व फॅक्स - ०२५५७-२९९६९६. (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ● Mail id : newseditnsk@deshdoot.com